# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/11/2023 (गुरूवार) दुपार

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत किनी भारकस येथे दिनांक ०८/११/२०२३ चे १४.५० वा. ते १५.४५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथील स्टाफ हे पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीत पेट्रोलींग करीत असताना नमुद घटनास्थळी एक ट्रॅक्टर ट्रॉली संशयितरीत्या येतांना दिसली. ट्रॅक्टरला थांबवून चेक केले असता ट्रॅक्टरमध्ये **आरोपी नामे— १) लालसिंग शंकरसिंग राठोड, वय ३३ वर्षे रा. बादलपुर शिवनी २) मालक नामे— मोहम्मद वसुद जुबेर अंसारी, वय ३८ वर्षे रा. वार्ड क्र. ०४ नवीन वस्ती बुट्टीबोरी** हे ट्रॅक्टर क्र. MH 40 L 5402 मध्ये सालेगाव शिवारातून काळी रेती भरून चोरी करतांना मिळुन आल्याने आरोपींच्या ताब्यातून ट्रॅक्टर क्र. MH 40 L 5402 मध्ये ०१ ब्रास रेती किंमती ४५००/— रू. ट्रॅक्टर ट्रॉली किंमती ५५००००/—रू असा एकुण ५५४५००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी एमआयडीसी बोरी पोलीसांनी, पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, ३४ भांदवि. कायदयान्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार दीप पांडे पोस्टे एमआयडीसी बोरी मो. नं. ८८८८८३८९९५ हे करीत आहे.

## बैलबंडीचे लोखंडी चाक चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील मौजा दहेगाव जोशी शिवार येथे दिनांक ०७/११/२०२३ चे १७.०० वा. ते दिनांक ०८/११/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— माधव विष्णुजी बोंदरे, वय ३८ वर्षे रा. दहेगाव जोशी पारशिवनी जि. नागपूर याचा काका अजय चिंतामण बोंदरे रा. दहेगाव जोशी ह. मु. अयोध्या नगर नागपूर यांचे मालकीचे शेतात ठेवलेले बैलबंडीचे दोन्ही लोखंडी चाक किंमती १०,०००/—रू. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार दिलीप टेकाम मो.क्र. ९७६४९३३५५४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर